पंतप्रधान मोदी यांच्या समावेत केंद्रीय मंत्री जाधव यांचा योग दिन कार्यक्रमात सहभाग >>पान 2

नगर पंचायत प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा चव्हाट्यावर; नगर पंचायत संवेदना संपल्या >>पान 3

केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या बुलढाणा लोकसभा मतदारसंघात योग दिन उत्साहात साजरा >>पान 4

**सुविचार**

आपल्या जीवनात शांतता राखा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 281 ■ रविवार, दि. 22 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



धनुष अभिनीत कुबेर चित्रपटाचं सोशल मीडियावर कौतुक, प्रेक्षकांनी केला प्रेमाचा वर्षाव...

आतील पान

## उचित आणि योग्य वेळी कर्जमाफीचा निर्णय : मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** सरकारने दिलेला एकही शब्द फिरवणार नाही. उचित आणि योग्य वेळी कर्जमाफीचा निर्णयसुद्धा राज्य सरकार घेईल, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली आहे. शनिवार, २१ जून रोजी पुण्यात जागतिक योगदिनानिमित्त वारकरी भक्तीयोग कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर त्यांनी माध्मांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''कर्जमाफी कधी करायची यासंदर्भात काही नियम आणि पद्धती आहे. या सरकारने दिलेला एकही शब्द फिरवणार नाही. उचित आणि योग्य वेळी कर्जमाफीचा निर्णयसुद्धा राज्य सरकार घेईल,'' असे ते म्हणाले.

''योग विद्या ही आपली प्राचिन संस्कृती आणि आपली जीवनपद्धती आहे. ही योगविद्या आणि आसने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगभरात पोहोचवण्याचे काम केले. जगातील सर्व देशांमध्ये आज योग दिनाच्या निमित्ताने योगासन करण्याचे काम तिथले लोक करत आहेत. पुण्यात आज अतिशय अभिनव कार्यक्रम झाला. योगदिनाच्या दिवशी पुण्यात वारी आली आहे. त्यामुळे वारकरी बंधू-भगिनींसोबत भक्तियोगाचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मंत्री चंद्रकांत पाटील, राजेश पांडे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माध्यमातून सर्व दिंड्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी आणि त्यासोबत ७०० महाविद्यालयांमध्ये एकाच वेळी हा योग दिवस साजरा करण्यात आला. अतिशय आनंद देणारा हा कार्यक्रम होता,'' असे त्यांनी सांगितले. ''आळंदीच्या विकास आराखड्यात आळंदीत एक



आरक्षण कत्तलखान्याकरिता दाखवले आहे. कुठल्याही परिस्थितीत आळंदीत कत्तलखाना करता येणार नाही. त्यामुळे मी स्वत: कत्तलखान्याचे आरक्षण वगळण्याचे आदेश दिले आहेत. कोणत्याही परिस्थितीत आळंदीत कत्तलाखाना करु दिला जाणार नाही,'' असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

''जगातील पहिल्या ६०० विद्यापीठांमध्ये आता पुणे विद्यापीठ आले आहे. जगामध्ये पहिल्या पाचशे विद्यापीठांना मान असतो. त्यामुळे पुढच्या वर्षी किंवा येत्या दोन वर्षात पहिल्या पाचशे विद्यापीठात आपली विद्यापीठे असावीत, हे आपले स्वप्न पूर्ण होण्याच्या दिशेने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे. त्यामुळे येथील कुलगुरू, व्यवस्थापन परिषद आणि प्राध्यापकांचेसुद्धा अभिनंदन करतो,'' असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### महाराष्ट्रात हिंदी सक्तीच्या वादात विचित्र ट्विस्ट! मुंबईतील एका नामांकित शाळेत वाटली पंजाबी भाषेची पुस्तके

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात हिंदी भाषेच्या सक्तीवरुन मोठ वाद सुरु आहे. आता या वादात विचित्र ट्विस्ट आला आहे. मुंबईतील एका नामांकित शाळेत पंजाबी भाषेची पुस्तके वाटण्यात आली आहेत. यामुळे राज ठाकरे यांची महाराष्ट्र नव निर्माण सेना पुन्हा एकदा आक्रमक झाली आहे. पुस्तके परत घेण्याची मागणी मनसेने केली आहे.महाराष्ट्रात हिंदी सक्ती चालणार नाही आणि पंजाबी सक्ती तर मुळीच खपवून घेतली जाणार अशी ठाम भूमिका मनसे आहे. मुंबईच्या भांडुप परिसरात असलेल्या गुरुनानक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना पंजाबी भाषेची पुस्तके वाटण्यात आली. मनसेच्या कार्यकर्त्यांनी दिली शाळेला धडक. अखेर शाळा प्रशासनाकडून वाटण्यात आलेली पंजाबी पुस्तके परत घेण्यात येणार याचे आश्वासन देण्यात आले. शाळेच्या बाहेर पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### बीड जिल्ह्यात भीषण अपघात; भरधाव वेगातील कारच्या धडकेत युवक ठार, २ जखमी

**बीड/प्रतिनिधी :** राज्यात रस्ते अपघाताचे प्रमाण गेल्या काही महिन्यांत वाढल्याचं पाहायला मिळत असून विविध अपघातात अनेक ठिकाणी प्रवाशांचा जीव गेल्याच्या घटना घडल्या आहेत. बीड जिल्ह्यातही अपघाताच्या अनेक घटना घडल्या असून आज पुन्हा एकदा भीषण अपघाताची घटना घडली. केज-अंबाजोगाई रोडवर भरधाव वेगातील कारने एका पायी जाणाऱ्या मुलाला धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अपघाताची घटना घडल्यानंतर स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य सुरू केले. तसेच, घटनेची माहिती स्थानिक पोलिसांनाही देण्यात आली. दरम्यान, अपघातातील जखमींना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. बीड जिल्ह्यातील केज-अंबाजोगाई रोडवरल भरधाव वेगातील कारने मुलाला धडक दिल्यानंतर ही कार रस्त्याच्या बाजूला असलेल्या खड्ड्यात जाऊन पडली. त्यामध्ये, पायी चालणाऱ्या मुलाचा मृत्यू झाला असून कारमधील दोघेजण देखील जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील लोकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात दाखल केले. गेल्या काही दिवसात अंबाजोगाई रोडवर अपघाताच्या घटना वाढल्या असून या मागील कारण शोधणं व उपाय करणे गरजेचं आहे.

### कामावरुन काढल्याचा राग मनात धरला, पिंपरीत सोसायटीच्या गेटवरच सुरक्षारक्षकावर हल्ला

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात सातत्याने गुन्हेगारी घटनांच्या बातम्या कानावर पडत आहेत .किरकोळ कारणावरून मारहाणीच्या अनेक घटना समोर येत असताना आता पिंपरी चिंचवड मध्ये चक्क सुरक्षारक्षकावरच चाकूने हल्ला झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे . राम लोंढे असं हल्लेखोर आरोपीचे नाव असून चिंचवडमधील शांतीवन सोसायटीमध्ये ही घटना घडली आहे.चिंचवड गावातील शांतीबन सोसायटीमध्ये सुदाम कामिठे हे सुरक्षारक्षक म्हणून गेटवर बसले होते .आरोपीने सोसायटीमध्ये घुसण्याचा प्रयत्न करतात सोसायटीमध्ये कसा घुसतो असे विचारत सुरक्षारक्षक असणाऱ्या सुदाम कामेठे यांनी आरोपीस थांबवले .आरोपी राम लोंढे याने काही वेळ सुरक्षारक्षकासोबत बातचीत केली. नंतर अचानक चाकू काढत सुरक्षारक्षकावर हल्ला चढवला. या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी सुरक्षारक्षकाने शेजारीच असणाऱ्या टेबलवरील वीट उचलत प्रतिकार केला .मात्र आरोपीने सुरक्षारक्षकाच्या हातात असणारी वीट हिसकावून घेतली .व त्याच विटेने त्यांच्या डोक्यावर जीवघेणा प्रहार केला .हा संपूर्ण प्रकार सोसायटीच्या सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाला आहे .आरोपी राम लोंढे पूर्वी याच शांतीवन सोसायटीमध्ये हाउसकीपिंगचे काम करायचा .मात्र व्यसनाधीन असल्याने त्याला कामावरून काढून टाकण्यात आले होते.याचाच राग डोक्यात धरत त्याने हा हल्ला केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवलाय.

## लाडक्या बहिणीनंतर शिवसेना राज्यभर राबविणार लाडकी सून, कसा असणार उपक्रम?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुतीनं विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना आणली होती. या योजनेला महाराष्ट्रातून प्रचंड आणि अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे शिवसेनेनं राज्यात माझी लाडकी सून उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला. शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात राज्यात लाडकी सून उपक्रम राबवणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलीय.

लाडकी बहीण योजना यशस्वी ठरल्यामुळे विधानसभा निवडणुकीत राज्यातील महिलांचे पाठबळ महायुतीला मिळालं. त्यामुळं महायुतीची सत्ता आली. लाडकी सून या उपक्रमाच्या माध्यमातून लाडक्या सुनेला मदत आणि सहकार्य केलं जाणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील शोषित, पीडित आणि कौटुंबिक छळाला त्रासलेला सुनांना शिवसेनेकडून मदत केली जाणार असल्याची माहिती शिवसेनेच्या नेत्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ईटीव्ही भारतशी बोलताना दिली आहे.

राज्यातील जिल्ह्यांमध्ये केंद्र स्थापन करणार-अनेक महिला कौटुंबिक हिंसाचार आणि शोषणाला बळी पडतात. महिलांचा विविध स्तरावर होणारा छळ आणि शोषण रोखण्यासाठी शिवसेना लाडकी सून उपक्रम आम्ही राबवत आहोत. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये



यासाठी आम्ही केंद्र स्थापन करीत आहोत. ज्या महिलांना कौटुंबिक हिंसाचार अथवा छळाला सामोरे जावे लागते, अशा सर्व महिलांना कायदेशीर आणि सामाजिक पातळीवर मदत करण्यात येणार आहे. हा उपक्रम लवकरच राबवणार असल्याचे गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे ग्रामीण भागातील महिला विशेषता आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत. यानंतर महिलांना कौटुंबिक होणार छळ किंवा त्रास याबाबत त्या महिलेला पक्षाकडून मदत केली जाणार आहे, अशी माहिती विधान परिषदेच्या उपसभापती आणि शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली.

दरम्यान, पुणे जिल्ह्यात वैष्णवी हगवणे या विवाहित महिलेच्या मृत्यूनंतर राज्यभरातील महिलांच्या छळाच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. अनेक कुटुंबात छळ होत असताना त्यावर महिलांना दिलासा देणारा उपक्रम शिवसेनेकडून राबविण्यात येणार आहे. त्यामुळे लाडकी बहीणनंतर पुन्हा एकदा शिवसेना महिलांसाठी उपक्रम राबवून लोकप्रियता मिळविणार असल्याचं चित्र आहे.

### वाढदिवसाच्या पार्टीत १४ वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार, ओळखीच्या नराधमांनी केला घात, मुंबई हादरली

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या मालवणी परिसरात अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याच्या धक्कादायक घटना घडली आहे. १४ वर्षीय शाळकरी मुलीवरती एका वाढदिवसाच्या पार्टीमध्ये दोन मुलांनी अत्याचार केल्याचा ही धक्कादायक घटना घडली आहे. मुलीचा जबाब घेऊन मालवणी पोलिसांनी पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करत दोन आरोपींना अटक केली आहे. मालवणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दोन्ही आरोपी मुलीच्या ओळखीचे आहेत. वाढदिवसाच्या पार्टीमध्ये या दोन्ही आरोपीने अल्पवयीन मुलीला धमकावून तिच्यावर अत्याचार केलाची माहिती समोर आली आहे. ही घटना काही दिवसांपूर्वीची आहे, पीडित मुलीच्या कुटुंबीयांना माहिती मिळतात त्यांनी मालवणी पोलिसांकडे धाव घेतली, याप्रकरणी मालवणी पोलिसांनी तात्काळ पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करत अत्याचार करणाऱ्या दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

पोलिसांनी या प्रकरणी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी ही शाळेत शिकणारी आहे. तिच्या ओळखीच्या एका व्यक्तीने तिला विश्वासात घेऊन तिच्यासोबत गैरवर्तन केले आहे. दुसऱ्या आरोपीनेही यात सहभाग घेतल्याचे समोर आले आहे. मुलीने घडलेला प्रकार आपल्या कुटुंबीयांना सांगितल्यानंतर त्यांनी पोलिसांत धाव घेतली आहे.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या सत्कार सोहळ्याचे बुधवारी अमरावतीत आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावतीचे सुपुत्र असणारे देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार सोहळा अमरावती वकील संघाच्यावतीनं करण्यात येणार आहे. येत्या बुधवारी सायंकाळी ६ वाजता पोटे अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्वामी विवेकानंद सभागृहात या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भातील माहिती अमरावती वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनील देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

''सध्या न्यायालयाला सुट्ट्या



आहेत. यामुळं सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांना सत्कारासाठी नागपूर आणि औरंगाबाद वकील संघाच्यावतीनं निमंत्रित करण्यात आलं आहे. असं असताना सरन्यायाधीश म्हणून त्यांनी आपला पहिला सत्कार आपलं गाव असणाऱ्या अमरावती वकील संघाच्यावतीनं स्वीकारणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. त्यांनी २५ जून ही तारीख स्वतः दिली आहे. भूषण गवई यांनी सुरुवातीच्या काळात ज्येष्ठ अधिवक्ता राजाभाऊ भोसले यांच्या मार्गदर्शनात अमरावती जिल्हा न्यायालयात वकील म्हणून १९८५ ते १९८६ या दरम्यान काम केलं आहे. यामुळं जिथून आपल्या कामाची सुरुवात झाली, त्या अमरावती न्यायालयातील वकील संघाच्या सत्कार सोहळ्याला पहिला मान देत आहेत,'' असं ॲड. सुनील देशमुख यांनी सांगितलं.

## धाराशिव हादरलं! ऑनलाईन गेमिंगने केला खेळ, संपूर्ण कुटुंब संपलं, आधी मुलाला विष दिलं अनब...

**धाराशिव/प्रतिनिधी :** धाराशिव तालुक्यातील बावी येथील एका घरात तिहेरी मृत्यूची घटना घडली आहे. इथं एका तरुणाने आपल्या दोन वर्षांच्या लेकराला आणि पत्नीला विष देऊन त्यांची हत्या केली. यानंतर स्वत:ही गळफास घेऊन आयुष्याचा शेवट केला. एकाच घरात तीन मृतदेह आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. मात्र .या तिघांच्या मृत्यूचं कारण समोर आलं आहे. कारण ऐकून गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

लक्ष्मण जाधव असं आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचं नाव आहे. तो धाराशिव तालुक्यातील बावी येथे आपल्या दोन वर्षांचा मुलगा आणि पत्नीसह वास्तव्याला होता. मागील चार वर्षांपासून लक्ष्मण जाधव या तरुणाला ऑनलाइन गेमिंगचा नाद लागला होता. ऑनलाइन रमी गेमच्या आहारी जाऊन त्याने आपली कोट्यवधि रुपयांची जमीन विकली होती. तसेच राहती जागा देखील त्याने विकली.

या प्रकरणी पोलिसांना तरुणाच्या घरातून चार रजिस्टर आणि महत्त्वाची कागदपत्रं मिळाली आहेत. यात जमीनीच्या व्यवहाराची नोंद आहे. सतत ऑनलाईन गेमच्या नादात पैसे गेल्याने लक्ष्मण जाधव नैराश्यात गेला होता. यातूनच त्याने पत्नी आणि मुलाची हत्या करून स्वत: आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला. घटनेच्या दिवशी त्याने सगळ्यात आधी दोन वर्षांच्या मुलाला विष दिलं. यानंतर त्याने पत्नीला देखील विष देऊन मारलं. दोघांचा मृत्यू झाल्याची शाहनिशा केल्यानंतर त्याने स्वत: गळफास लावून आत्महत्या केली.

## कर्जापायी लेकीला राजस्थानमध्ये विकले

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** कर्ज फेडता आले नाही म्हणून अवैध सावकारीचा धंदा करणाऱ्या सावकाराने चक्क कर्जदार महिलेची मुलगी राजस्थानमध्ये विकायला लावल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी केला. तसेच, दोन दिवसापूर्वी सावकाराने एका १२ वर्षांच्या मुलीवर अतिप्रसंग केला. बुलढाणा जिल्ह्यातील तारापूर बोरखेड या आदिवासी बहुल गावामध्ये सुनील बुरड या अवैध सावकाराचा हैदोस वाढला आहे.असा आरोप आमदार

### शिंदें शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांचा पत्रकार परिषदेत आरोप

संजय गायकवाड यांनी माध्यमांशी संवाद साधताना केला आहे.

यावेळी ते म्हणाले की, राज्यात अवैध सावकारीच्या माध्यमातून शेतकरी, मजूर व गोरगरिबांना त्रास दिला जात असल्याच्या अनेक घटना सातत्याने समोर येतात. अनेकदा अशा प्रकरणात बड्या व्यक्तींना, पोलीस अधिकाऱ्यांना हाताशी धरुन सावकार आपली पोळी भाजत असतात. त्यामुळे, अवैध सावकारकीचा धंदा मांडलेल्यांना वेळीच आळा बसत नाही, किंवा त्यांच्यावर कारवाईचा बडगाही उगारला जात नाही. महाराष्ट्रात अनेक शेतकऱ्यांच्या बायका पैसे मिळाले नाहीत म्हणून सावकाराने गहाण ठेवल्या आहेत. अनेक ठिकाणी सावकाराने व्याजाचे पैसे मिळाले नाहीत म्हणून शेतकऱ्यांच्या बायकांवर, त्यांच्या मुलीवर अतिप्रसंग केल्याचा खळबळजनक आणि गंभीर आरोप संजय गायकवाड यांनी केला आहे.

सावकारकीच्या कायद्याचा गैरवापर करुन हे हैदोस घालत आहेत. आम्ही या प्रकरणात उच्च न्यायालयापर्यंत



लढा देऊ. या आदिवासी गावात सावकार शेतकऱ्यांच्या शेती हडप करत आहेत. जो सावकार पैशासाठी मुलीला विकायला लावतो, अशा सावकाराची मस्ती सरकारने उतरवावी. याबाबत मी विधासभेत आवाज उठवणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ह उपमुख्यमंत्री यांना विनंती आहे की, या प्रकरणात शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणीही संजय गायकवाड यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील तारापूर बोरखेड या आदिवासी बहुल गावामध्ये सुनील बुरड या अवैध सावकाराचे नाव घेत त्याच्यावर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली आहे.


## भारतीय संघ इतिहास घडवेल ?

भारताच युवा क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला असून तिथे दोन्ही देशात पाच कसोटींची मालिका होणार आहे. या मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यास २० जून पासून सुरुवातही झाली आहे. पहिल्या कसोटीच्या पहिल्या दिवशी भारतीय फलंदाजांनी चांगली कामगिरी करत ३०० च्या वर धावा काढल्या त्याही फक्त तीन गडी गमावून. पहिल्याच दिवशी भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वाल आणि नवनियुक्त कर्णधार शुभमन गिल यांनी शतके झळकावली. उपकर्णधार ऋषभ पंतने अर्धशतक झळकावले. दोघेही पहिल्या दिवशी नाबाद असल्याने दुसऱ्या दिवशी त्यांच्या धावात भरच पडेल कदाचित शतकाचे द्विशतकात आणि अर्धशतकाचे शतकात रूपांतर झाले असेल. असो या आव्हानात्मक आणि दीर्घ दौऱ्याची सुरुवात तर चांगली झाली या बद्दल या युवा खेळाडूंचे अभिनंदन करायला हवे. मी या संघाला युवा संघ असे म्हणतो कारण या संघातील सर्वच खेळाडू युवा आहेत. बुमरा, करून नायर आणि के एल राहुल सोडल्यास सर्व खेळाडू तिशीच्या आतील आहेत. या खेळाडूंना कसोटी सामने खेळण्याचा अनुभव कमी आहे. काही खेळाडू तर पहिल्यांदाच इंग्लंडमध्ये खेळत आहेत. इंग्लंडमध्ये खेळणे हे नेहमीच आव्हानात्मक असते कारण तेथील स्विंग होणाऱ्या चेंडूसमोर भल्या भल्या फलंदाजांचा निभाव लागत नाही. त्यात तेथील हवामान बेभरवशाचे आहे. क्षणात ऊन तर क्षणात पाऊस पडत असल्याने खेळपट्टी नेहमी आपला रंग बदलत असते. शिवाय इंग्लंडच्या खेळपट्टीवर भारताची कामगिरी नेहमीच निराशाजनक राहिली आहे. भारताने इंग्लंडमध्ये शेवटचा मालिका विजय १८ वर्षापूर्वी म्हणजे २००७ साली राहुल द्रविडच्या नेतृत्वाखाली मिळवला होता. त्यानंतर अनेकदा भारताने इंग्लंडचा दौरा केला मात्र भारताला इंग्लंडमध्ये मालिका विजय मिळवता आला नाही. महेंद्रसिंग धोनी, विराट कोहली, रोहित शर्मा यांच्या नेतृत्वाखाली भारताने इंग्लंडमध्ये कसोटी मालिका खेळल्या. मालिकेत एखादा दुसरा विजय जरूर मिळाला पण भारताला मालिका खिशात घालता आली नाही. या अठरा वर्षात भारतीय संघात अनेक दिग्गज खेळाडू येऊन गेले. त्यांनी स्वतः च्या धावांच्या राशी उभारल्या, विक्रमांचे इमले रचले पण सांघिक कामगिरी करून इंग्लंडमध्ये मालिका विजय मिळवण्याचा चमत्कार त्यांना करता आला नाही. हा चमत्कार शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील हा युवा संघ करू शकेल का ? असा प्रश्न क्रिकेट विश्वात विचारला जात आहे. याचे उत्तर प्रथम दर्शनी नाही असेच देतील कारण हा भारताचा हा संघ युवा आणि अननुभवी आहे. इंग्लंड संघापुढे यांचा निभाव लागणार नाही असेच सर्वांना वाटते मात्र या युवा खेळाडूंनी स्वतःच्या क्षमतेने खेळ केला, आपल्या नैसर्गिक गुणवत्तेला न्याय दिला आणि मागील इतिहास विसरून संघ म्हणून एकजुटीने खेळ केल्यास हा संघ इंग्लंडला हरवून इतिहास घडवू शकतो. तशी क्षमता या संघात निश्चित आहे. या युवा खेळाडूंमध्ये जोश आहे. पण केवळ जोश असून उपयोग नाही. जोश सोबतच होशही असावा लागतो. कसोटी सामना जिंकण्यासाठी संयम खूप महत्वाचा आहे. टी २० प्रमाणे चौकार षटकार मारून धावा इथे निघत नाही. इथे संयम खूप महत्वाचा आहे. या खेळाडूंनी संयमाने फलंदाजी करून मोठी धावसंख्या उभारली आणि गोलंदाजांनी इंग्लंडचे वीस फलंदाज बाद करण्यावर भर दिला तर हा संघ इंग्लंडला निश्चितच आश्चर्याचा धक्का देऊ शकतो. अर्थात यावेळचा इंग्लंडचा संघही पूर्वीतका बलवान नाही. कर्णधार बेन स्टोक्स व ज्यो रूट वगळता त्यांचा एकही फलंदाज नावाजलेला नाही. त्यांची गोलंदाजीही आता पूर्वी इतकी घातक राहिली नाही. जेम्स अँडरसन आणि स्टुअर्ट ब्रॉड यांच्या निवृत्तीनंतर त्यांची जागा घेणारा एकही गोलंदाज त्यांना मिळाला नाही. मार्क वूड आणि जोफ्रा आर्चर हे त्यांचे मुख्य वेगवान गोलंदाज दुखापतींने ग्रासले आहेत. ते किती कसोटी खेळतील हे खुद्द ते ही सांगू शकणार नाही. त्यांचा फिरकी गोलंदाजही नवखा आहे त्यामानाने आपली गोलंदाजी खूप चांगली आहे. जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा भारताच्या ताफ्यात आहे तो तीन कसोटी खेळणार आहे त्यामुळे या तीन कसोटीत भारताचे पारडे निश्चितच जड राहील. बुमराला सिराज, प्रसिद्ध कृष्णा, अर्शदीप सिंग यांची साथ मिळेल. जडेजा, कुलदीप यादव हे जागतिक स्तरावर नावाजलेले फिरकी गोलंदाज भारताच्या ताफ्यात आहे. नितीश रेड्डी आणि शार्दुल ठाकूर हे अष्टपैलू खेळ करण्यात माहीर आहेत त्यामुळे हा संघ जरी नवोदित, युवा खेळाडूंचा असला तरी त्यांनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर हा संघही इतिहास घडवू शकतो यात शंका नाही. इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाला मालिका विजयासाठी मनापासून शुभेच्छा!

# पंतप्रधान मोदी यांच्या समवेत केंद्रीय मंत्री जाधव यांचा योग दिन कार्यक्रमात सहभाग

**विशाखापट्टणम/वृत्तसंस्था :** आंतरराष्ट्रीय ११ योग दिना निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समवेत केंद्रीय आयुष स्वतंत्र प्रभार तथा आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार आल्यानंतर पहिल्याच वर्षी जागतिक पातळीवर २१ जून हा जागतिक योग दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली. भारतीय परंपरा आणि संस्कृतीवर जागतिक पातळीची उमटलेली ही एक मोहोरच होती. आज जगभरात योग साधनेचा झालेला आहे.प्रचार आणि प्रचार हे






निश्चितच आजच्या जागतिक योग दिनाचं यश म्हणावं लागेल असे मत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले. यावेळी आंध्रप्रदेश चे राज्यपाल श्री अब्दुल नजीर,आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू, उपमुख्यमंत्री पवन कल्याण व आंध्रप्रदेश सरकार मधील मंत्री व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## अहमदाबाद विमान अपघातातील क्रू मेंबर इरफान शेख यांच्यावर ९ दिवसांनी अंतिम संस्कार

**पिंपरी /प्रतिनिधी :** अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमानाचा भीषण अपघात झाला होता. या अपघातग्रस्त विमानातील क्रू मेंबर्ससह २४२ प्रवाश्यांचा मृत्यू झाला होता. एअर इंडियाच्या विमान अपघातात मृत्यू झालेले पिंपरी चिंचवड येथील क्रू मेंबर इरफान समीर शेख यांचं पार्थिव शनिवारी शहरात आणण्यात आलं. यावेळी त्यांचं पार्थिव अंतिम दर्शनासाठी संत तुकाराम नगर इथं त्यांच्या घरी ठेवलं होतं. यानंतर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

इरफान यांच्या मृत्यूमुळे शहरात शोककळा पसरली. नेहरूनगर इथल्या हजरत बिलाल इतगाह कब्रस्तान, नेहरूनगर इथं इरफान यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. एअर इंडियाच्या विमान अपघातात जवळपास २४२ प्रवासी दगावल्यानं मृतांची ओळख पटवण्याचं मोठं आव्हान आरोग्य नियंत्रणासमोर होत. मात्र वैद्यकीय विभागानं मृतांच्या नातेवाईकांचे डीएनए सॅम्पल गोळा करून मृतांची ओळख पटवली. अशाप्रकारे इरफान शेख यांच्या पार्थिवाचे डीएनए सॅम्पल त्यांच्या कुटुंबीयांशी मॅच झाल्यानंतर इरफान शेखच पार्थिव त्यांच्या कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आलं.

# पाटील माध्यमिक विद्यालात योग दिन उत्साहात साजरा

## कर्मचारी व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग





दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव :** योग: कर्मसु कौशलम् या भगवद्गीतेतील शिकवणीनुसार योग ही केवळ व्यायामाची पद्धत नसून, ती आरोग्य, समतोल आणि मानसिक शांती प्राप्त करण्याची जीवनशैली आहे. एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग या २०२५ सालच्या संकल्पनेनुसार बेळगाव येथील महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालय बेलगाव या ठिकाणी २१ जून २०२५ रोजी योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक दीपक कुटे यांनी मानवी जीवनामध्ये निरामय आरोग्य आणि तणावमुक्त व निरोगी जीवनशैली राहण्यासाठी योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना व उपस्थित सर्व कर्मचारी वृंदांना सांगून फक्त योग दिनाच्या दिवशी योग न करता संपूर्ण जीवनभर योगाचे नित्य नियमाने दिनक्रम ठेवून स्वतःला निरोगी व ऊर्जावान राहण्यासाठी योग करण्याचे आवाहन करून उपस्थितांना योगाचे धडे दिले.योग ही भारताची प्राचीन आणि अमूल्य देणगी आहे. आपल्या शरीराच्या, मनाच्या आणि आत्म्याच्या समतोलासाठी योगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाने दररोज काही वेळ योगासाठी द्यावा, असे आवाहन केले.सदर कार्यक्रमासाठी विद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

## सोबत दारु प्यायला बसले अनब शाब्दिक चकमक, 'टकल्या'ने काढला जिवलग मित्राचा काटा; अकोला हादरलं

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला शहरातील रमाबाई नगर परिसरात एका धक्कादायक घटना घडली आहे. प्रकाश पंचू जोसेफ (वय अंदाजे ३५) या युवकाची त्याच्या जवळच्या मित्रानेच निर्घृण हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. पवन विलास मोरे उर्फ 'टकल्या' (रा. अकोला) असे आरोपीचे नाव असून, तो सध्या फरार आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, प्रकाश आणि पवन हे दोघेही चांगले मित्र होते. मंगळवारी रात्री ते रमाबाई नगर चौकात एकत्र दारू पीत होते. दरम्यान, त्यांच्यात काही कारणावरून शाब्दिक चकमक झाली. त्यातूनच पवन उर्फ 'टकल्या'ने अचानक रागाच्या भरात प्रकाशवर दगडाने वार केले. या हल्ल्यात प्रकाश गंभीर जखमी झाला.

आरोपी फरार, पोलिसांकडून शोध सुरु

स्थानिक नागरिकांनी तातडीने प्रकाशला रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. घटनेनंतर पवन मोरे हा घटनास्थळावरून पळून गेला असून, पोलिसांनी त्याच्या शोधासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. घटनेची माहिती मिळताच जुने शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, पुढील तपास सुरू केला आहे.

दोन दिवसांत दुसरे हत्याकांड

दरम्यान, अकोल्यात गेल्या दोन दिवसांत हे दुसरे हत्याकांड असून, याआधी अकोट फैल भागात एका व्यक्तीची हत्या झाली होती, तर घटनेत दोन जण गंभीर जखमी झाले होते. विशेष म्हणजे, त्या घटनेमागेही किरकोळ वादच कारणीभूत ठरला होता. त्यामुळे शहरात कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

व्याजाच्या पैशातून तरुणाचे अपहरण

दरम्यान, बीडच्या धारूरमध्ये उसने घेतलेल्या दहा हजार रुपयांचे व्याजासह ८० हजार रुपये झाल्याने ते वसूल करण्यासाठी एका तरुणाचे चौघा जणांनी अपहरण केले. तसेच त्या मुलाच्या घरी फोन करत मुलगा जिवंत पाहिजे असेल तर आताच्या आता पन्नास हजार रुपये टाका, नाहीतर तो तुम्हाला दिसणार नाही, अशी धमकी दिली. या प्रकरणात धारूर पोलिसांनी तातडीने तपास करत अंबाजोगाई जवळील साकुर येथून दोघांना अटक केली आहे तर दोघेजण फरार आहेत. कृष्णा मैंद असे अपहरण झालेल्या युवकाचे नाव असून त्याच्यावर सध्या अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते ७४२ गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ

**दारव्हा/प्रतिनिधी :** दारव्हा तालुका शिवसेनेच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळ्यात तालुक्यातील विविध शाळांमधील एकूण ७४२ विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा येथे सत्कार पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आला. गेल्या २१ वर्षापासून संजय राठोड मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा यथोचित सत्कार करतात. त्यांच्या या शैक्षणिक सेवाव्रतामुळेच ते आज विख्यात आहेत. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच पालकमंत्री संजय राठोड यांचे स्वागत दारव्हा तालुक्यातुन प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्या समवेत ढोल ताशाच्या गजरात स्वागत करण्यात आले. तदनंतर सरस्वती मातेचे पुजन करून पाहुण्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी, उपविभागीय पोलीस अधिकारी रजनीकांत चिलुमुला, श्रीधर मोहोड जिल्हा प्रमुख यवतमाळ, सौ. कालिंदा पवार माजी जि.प. अध्यक्षा, वैशाली म्हासाळ महिला सहसंपर्क प्रमुख, पराग पिंगळे, माजी जिल्हाप्रमुख, मनोज सिंगी शिवसेना तालुका प्रमुख, राजु दुधे, शहर प्रमुख, चितंगराव कदम, बि .एन.पवार, भाऊसाहेब ढवळे नेर, सुभाष राठोड, सुशांत इंगोले, दामोधर लढ्ढा, सुनिता राऊत, उषात चव्हाण, अश्विनी कुरसिंगे,संगिता




इंगोले, यशवंत पवार, भाऊ जाधव, प्रविण मिरासे, देवराव पवार, ठाणेदार शिवप्रकाश मुळे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश भोयर व प्रा. किशोर राठोड यांनी केले. तालुक्यातून प्रथम दितीय व तृतीय येणाऱ्या १५ विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा मा.पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, तसेच डिझीटल वॉच व शैक्षणिक बॅग किट देऊन सत्कार करण्यात आला. आभार प्रदर्शन ओंकार निमकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शिवसेना, युवासेना , महिला आघाडी व भारतीय विद्यार्थी सेना, चैतन्य ग्रुप ऑफ स्पोर्ट्स, घनश्याम नगराळे, बंडु कान्हे. आनंद झोळ, राम मते,पांडुरंग तिरमारे, पांडूरंग राठोड, ओम लाकडे, किशोर यंगड,शंकर नागलवाडे, संदिप राठोड, हिम्मत चव्हाण, निलेश राठोड, प्रविण भगत, आकाश दुधे विशाल राठोड, गोपाल चव्हाण, गणेश दुबे, विनोद वांड्रस्वार, सचिन राठोड, पंकज नागोलकर,लाला गिरी, निलेश म्हातारमारे, ज्योती जोरे, सुरेखा राठोड मंगला निंबेकर साधना थेर शोभा राठोड आदी कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### शॉकिंग! मराठमोळ्या अभिनेत्याने केली आत्महत्या; मित्र म्हणाला, 'तू हरलास म्हणजे आम्ही सगळे हरलो'...

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी सिनेइंडस्ट्रीतील अभिनेता आणि दिग्दर्शक तुषार घाडीगावकर याने आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. काम मिळत नसल्यामुळे त्याने इतक्या टोकाचे पाऊल उचलले आहे. चला हवा येऊ द्या फेम अभिनेता अंकुर वाढवेने त्याच्या निधनाची माहिती सोशल मीडियावर शेअर केली आहे. तुषार घाडीगावकरच्या निधनामुळे मराठी सिनेइंडस्ट्रीवर शोककळा पसरली आहे.

अभिनेता अंकुर वाढवेने तुषार घाडीगांवकरच्या निधनासंदर्भात इन्स्टाग्रामवर पोस्ट केली आहे. अंकुरने तुषारचा एक फोटो शेअर करून भावुक कॅप्शन दिलं आहे. त्यांनी पोस्टमध्ये लिहिले की,''मित्रा का? कश्यासाठी? काम येतात जातात! आपण मार्ग काढले पाहिजे पण आत्महत्या हा मार्ग नाही! मान्य आहे सध्याची परिस्थिती विचित्र आहे पण हा निर्णय नाही होऊ शकत तुषार घाडीगावकर तू हरलास म्हणजे आम्ही सगळे हरलो.'' अभिनेता तुषार घाडीगावकरने नाटक, मालिका आणि चित्रपट अशा तिन्ही माध्यमात काम केले आहे. त्याने हिंदीतही काम केले आहे. तसेच काही जाहिरातींमध्येही तो झळकला होता. त्याने उनाड , झोंबिवली, लवंगी मिरची, मन कस्तुरी रे, भाऊबळी, हे मन बावरे, संगीत बिबट आख्यान या प्रोजेक्टमध्ये काम केले आहे.

### हुपरीत चांदी व्यावसायिकाच्या घरावर अनब कार्यालयावर ईडीची छापेमारी, १५ तास कसून चौकशी

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील चंदेरीनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हुपरीमध्ये आज (२१जून) ईडीची धाड पडल्याने एकच खळबळ उडाली. हुपरीमधील बड्या चांदी व्यावसायिकाच्या घरी ही धाड पडली होती. दरम्यान, या धाडीमध्ये तब्बल १५ तास कसून चौकशी करण्यात आल्याने परिसरातील चांदी व्यावसायिकांमध्ये चांगलीच चर्चा रंगली आहे. दरम्यान, अशा प्रकारची धाड ही पहिल्यांदाच पडल्याने शहरांमध्ये चांगली चर्चा रंगली. चांदी व्यवसायिकाच्या कार्यालयामध्ये ईडीच्या धाडीमध्ये तब्बल १५ तास चौकशी करण्यात आली. दरम्यान ही चौकशी सुरू असताना महावीर नगर परिसरामध्ये कोणालाही फिरकू दिली जात नव्हते. इतकेच नव्हे तर मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान, मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार या निधी बँक संबंधित असलेल्या व्यक्तीची चौकशी करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. चांदी व्यवसाय, निधी बँक व दुबईमधील शेअर मार्केट आदी व्यवसायामुळे या उद्योजकाच्या आर्थिक व्यवहाराची व्याप्ती मोठी आहे. गेल्या वर्षभराच्या कालावधीत या उद्योजकाच्या दुबईसह अनेक देशांचा प्रवास झाला असल्याने ईडीचे लक्ष यांच्यावर केंद्रित झाले आहे. मात्र, या चौकशीमध्ये नेमकं काय निष्पन्न झालं याबाबत अजून कोणताही तपशील कळू शकला नाही. हुपरी शहर चांदी व्यवसायासाठी ओळखले जाते. त्यामुळे बाजारपेठेत कोट्यधींची उलाढाल होत असते.

### कॅप्टन बनताच मोठी कामगिरी, बांगलादेशाचा नवा 'हिरो'; १२ वर्षानंतर मोडला मोठा रेकॉर्ड

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना गॉलच्या मैदानावर खेळला जात आहे. या सामन्याचा चौथा दिवस संपला तेव्हा बांगलादेशने दुसऱ्या डावात ३ विकेट्स गमावून १७७ धावा केल्या होत्या आणि एकूण १८७ धावांची आघाडी घेतली होती. बांगलादेश संघाचा कर्णधार नझमुल हुसेन शांतोने या सामन्यात आपल्या शानदार फलंदाजीने १२ वर्षे जुना विक्रम मोडला आहे, ज्यामध्ये शांतो आता बांगलादेशसाठी कसोटी सामन्यात कर्णधार म्हणून सर्वाधिक धावा करणारा खेळाडू बनला आहे.

गॉल कसोटी सामन्यात, बांगलादेश संघाचा कर्णधार नझमुल हुसेन शांतोने दोन्ही डावांमध्ये उत्कृष्ट फलंदाजी केली आहे, ज्यामध्ये शांतोने पहिल्या डावात १४८ धावा केल्या आणि दुसऱ्या डावात फलंदाजी करताना त्याने आतापर्यंत ५६ धावा केल्या आहेत. यासह, शांतोने या सामन्यात एकूण २०४ धावा केल्या आहेत. शांतोने आता मुशफिकुर रहीमचा विक्रम मोडला आहे, ज्याने २०१३ मध्ये गॉल मैदानावर श्रीलंकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यात बांगलादेश संघाचे नेतृत्व करताना एकूण २०० धावा केल्या होत्या.

चौथ्या दिवसाच्या खेळानंतर गॉलमध्ये खेळल्या जाणाऱ्या या कसोटी सामन्याचा निकाल पाहिला तर तो अनिर्णित राहण्याची शक्यता आहे. चौथ्या दिवसाच्या खेळात यजमान श्रीलंका संघाचा पहिला डाव ४८५ धावांवर संपला, ज्यामध्ये बांगलादेशचा संघ पहिल्या डावाच्या धावसंख्येपासून फक्त १० धावांनी मागे होता. श्रीलंकेकडून पथुम निस्सांकाने या सामन्याच्या पहिल्या डावात फलंदाजीसह १८७ धावांची शानदार खेळी केली. तर बांगलादेशकडून नईम हसनने गोलंदाजीत सर्वाधिक ५ बळी घेतले.

# नगर पंचायत प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा चव्हाट्यावर; नगर पंचायत संवेदना संपल्या

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** ढाकणी नगर परिषद हद्दीतील एका धार्मिक स्थळात मृत पडलेल्या श्वानाचे पार्थिव काढायला नगर पंचायत कर्मचाऱ्यांकडे वेळ नसल्याने संतप्त नगरसेवकाने श्वानाचे पार्थिव घासत ओढत ओरबडत नगर पंचायत मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात टाकले.यावरून नगर परिषद कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा चव्हाट्यावर आला आहे.तर, मस्तवाल कारभारावर अंकुश ओढण्यासाठीचे हे आंदोलन ढाणकीत चर्चेचा विषय बनला.

ढाणकी शहरातील संतोष पुरी हे ज्या प्रभागाचे नगरसेवक आहेत त्या प्रभाग क्रमांक १७ मधील हनुमान मंदीर व शिव मंदिर परीसरात एक श्वान मृत अवस्थेत आढळला होता. याची माहिती पुरी यांनी नगर पंचायत कर्मचारी प्रमोद गायकवाड यांना भ्रमणध्वनीवरुण कळविली. प्रमोद यांनी मृत श्वानाची विल्हेवाट लावून टाकेल असे पुरी यांना आश्वास्थ केले. दुपारी दीड वाजता पुरी यांनी त्यांना प्रत्यक्ष भेटलेल्या एका सफाई कर्मचाऱ्यांना मंदिरात मृत पडून असलेल्या श्वानाबाद्दल कल्पना दिली. त्याने देखील विल्हेवाट लावण्याबद्दल आश्वास्थ केले. त्यांनंतर पुरी ज्या कार्यक्रमाचे संयोजक आहेत. त्याच कार्यक्रमात भोजनावळी दरम्यान संबंधित कर्मचारी आला असताना पुरी यांनी मृत श्वानाच्या व्यवस्थापनाची खातरजमा केली. तेव्हा त्यांना संबंधित कर्मचाऱ्याने प्रक्रिया पूर्ण केल्याचे सांगितले. निर्धारित कार्यक्रम आटोपून सायंकाळी ५ च्या दरम्यान पुरी घरी गेले असता प्रभागातील महिला भाविकांनी श्वानाचे पार्थिव मंदीर परीसरात कुजत असल्याची नाराजी व्यक्त केली. यावर संतापलेल्या संतोष पुरी यांनी श्वानाचे पार्थिव फरफटत नगर पंचायत मुख्याधिकारी यांच्या दालनाच्या दिशेने नेले. या संपूर्ण प्रकारावरून गेंड्याची कातडी पांघरलेल्या निगरगट्ट नगरपंचायत प्रशासनाच्या, कामचुकार कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा हा चव्हाट्यावर आला असून, आता तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधीत कर्मचाऱ्यांवर कारवाई करतील का?ढाणकी नगरपंचायत येथे हल्ली ५१ दिवसानंतर पाणी




पुरवठा होत आहे. रस्ते नाल्या आणि नागरी सुविधा यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सदर प्रकार हा गंभीर असून, मनमानी करणाऱ्या, नागरिकांसोबत अरेरावी करणाऱ्या व सामान्य नागरिकांचे मालक होऊ

> माझ्या प्रभागातील हनुमान मंदिर येथे मृत श्वापदाचे पार्थिव असल्याचे मी सकाळी १०.३० वाजता नगर पंचायत कर्मचाऱ्यांना सांगितले. त्यानंतर दुपारी ३ वाजता सुद्धा त्यांना विचारणा केली असता त्यांनी ते शव नेऊन टाकल्याचे सांगितले. परंतु ५ वाजता मी प्रभागात आल्यानंतर त्या श्वापदाचे पार्थिव त्याच ठिकाणी दिसल्यामुळे मला प्रचंड वैताग आला आणि मी ते पार्थिव नगर पंचायत दालनात आणून फेकले.
>
> **–संतोष पुरी**
> **गटनेता तथा नगरसेवक.**

पाहणाऱ्या, निगरगट्ट, कामचुकार कर्मचाऱ्यांवर वरिष्ठ अधिकारी कठोर कारवाई करणार का ? असा मुद्दा उपस्थित झाला आहे.तसेच ढाणकी नगरपंचायत येथे बऱ्याच वर्षापासून असलेले स्थानिक कर्मचाऱ्यांची बदली करावी अशी चर्चा यावेळी उपस्थित नागरिक करताना दिसले.

## कसोटी क्रिकेटच्या इतिहासातला सर्वात छोटा सामना, ६२ चेंडूत संपला, काय होतं कारण?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** कसोटी क्रिकेटच्या इतिहासातला सर्वात छोटा सामना १९९८ साली वेस्टइंडीज आणि इंग्लंड यांच्यात खेळवण्यात आला होता. हा सामना फक्त ६२ चेंडूंमध्ये म्हणजेच १०.२ षटकांतच थांबवण्यात आला. भयानक खेळपट्टीमुळे फलंदाजांच्या जीवाला धोका असल्यामुळे हा सामना रद्द करण्यात आला होता. कारण फलंदाजांना हा सामना खेळताना अडचणी येत होत्या. फलंदाजांना खेळताना रक्त येत असल्यामुळे ते आपला जीव वाचवताना दिसत होते. हा सामना वेस्टइंडीजने आयोजित केला होता. हा सामना सबीना पार्क स्टेडियम येथे खेळवण्यात आला होता.

यावेळी इंग्लंडने नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, तेथील मैदान हे खूपच घातक होते. त्यामुळे इंग्लंडचे फलंदाज रक्तबंबाळ झाले होते. कारण बॉल थेट फलंदाजांच्या अंगावर आदळत होता.

१०.२ षटकांत संपला होता हा सामना

इंग्लंडकडून कॅप्टन माइक अर्थटन आणि विकेटकीपर एलक स्टीवर्ट हा होता. त्यावेळी वेस्टइंडीजची गोलंदाजी खूपच प्रसिद्ध होती. कर्टली एंब्रोस आणि कर्टनी वॉल्श हे दोघेही वेगवान गोलंदाज होते. त्यांनी जबरदस्त वेगाने आणि उंच उछाल देणाऱ्या चेंडूंनी इंग्लंडच्या फलंदाजांना अक्षरशः हैराण केलं. बॉल अंगावर लागत होता आणि फलंदाज रक्तबंबाळ झाले होते. दरम्यान, त्या दिवशी सबीना पार्क स्टेडियमवर एक वेगळीच उसळी आणि वेग होता. त्यामुळे चेंडू हा थेट फलंदाजांच्या शरीरावर आदळत होता. त्यामुळे तेथील फलंदाजासह इतर खेळाडूंनाही दुखापत झाली होती. खेळपट्टी खूपच प्राणघातक बनली होती. इंग्लंडचे फलंदाज रक्तबंबाळ झाले होते.

टेस्ट क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात लहान सामना

या सर्व गोष्टी लक्षात घेता तेथे असणाऱ्या अंपायर स्टीव बकनर आणि श्रीनिवास वेंकटराघानने हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, ज्यावेळी अंपायर यांनी हा निर्णय घेतला त्यावेळी खूप उशीर झाला होता. इंग्लंडचे काही फलंदाजांना दुखापत झाली होती. त्यांच्या शरीरावर दुखापतीच्या खुणा दिसत होत्या. तेथील मैदान हे इतके खराब होते की, अंपायर यांना हा सामना ६२ चेंडूमध्येच संपवावा लागला. फक्त १० ओवर आणि २ चेंडूत हा सामना संपला. ज्यामध्ये इंग्लंडने ३ विकेट गमावून फक्त १७ धावा केल्या होत्या. हा सामना क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात छोटा सामना ठरला. इतका भयानक अनुभव क्वचितच क्रिकेटच्या इतिहासात बघायला मिळाला.

## धक्कादायक! बीडमध्ये पैशांसाठी पुन्हा अपहरण, मुलगा जिवंत हवा असेल तर आता ५0 हजार टाका अन्यथा...

**बीड/प्रतिनिधी :** बीडमध्ये गुन्हेगारीच्या अनेक घटना वारंवार समोर येत आहेत. पैशांच्या वादातून हाणामारी, दिवसाढवळ्या होणाऱ्या हत्या, किरकोळ वादावादीतून जीवे मारण्याचा प्रयत्न, मारहाणीच्या गंभीर घटना घडत असतानाच बीडच्या धारूरमध्ये पैशांसाठी पुन्हा एकदा अपहरण झालं आहे. धारूरमध्ये उसने पैसे वसूल करण्यासाठी चार तरुणांनी एका तरुणाचे अपहरण केलं. मुलाच्या घरी फोन करून मुलगा जिवंत हवा असेल तर आताच्या आता ५० हजार रुपये टाका अन्यथा मुलगा तुम्हाला परत दिसणार नाही अशी धमकी दिली. हा प्रकार समोर आल्यानंतर पुन्हा एकदा जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात धारूर पोलिसांनी दोघांना अटक करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात एक धक्कादायक गुन्हा उघडकीस आला आहे. अवघ्या १० हजार रुपयांच्या उसनवारीवरून तब्बल ८० हजार रुपयांची वसुली करत एका तरुणाचे अपहरण केल्याची घटना समोर आली आहे. आरोपींनी थेट तरुणाच्या आईला फोन करून धमकी दिली – ''मुलगा जिवंत पाहिजे असेल तर ५० हजार पाठवा, नाहीतर तो कधी दिसणार नाही. ''ही घटना गुरुवारी सायंकाळी घडली असून अपहरण झालेल्या तरुणाचे नाव कृष्णा मैंद असे आहे. कृष्णाने काही महिन्यांपूर्वी धनराज चाटे, पृथ्वीराज राग आणि परमेश्वर आगाव यांच्याकडून १० हजार रुपये उसने घेतले होते. मात्र, आरोपींनी या रकमेवर दिवसाला १ हजार रुपयांचे व्याज लावले होते. याच हिशेबाने व्याजाची रक्कम ८० हजारांवर गेली. पैसे मिळवण्यासाठी कृष्णाचे अपहरण करण्यात आले. अपहरण केल्यानंतर आरोपींनी कृष्णाच्या आईला फोन करून ५० हजार रुपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास मुलाला सोडणार नाही, अशी थेट धमकी देण्यात आली. घाबरलेल्या आईने तात्काळ पोलिसांशी संपर्क साधला.

**दोघांना अटक, दोन जण फरार**

या प्रकरणात धारूर पोलिसांनी तातडीने तपास करत अंबाजोगाई जवळील साकुर येथून दोघांना अटक केली आहे.

## ३० वर्षांपूर्वी घेतली होती ५०० रुपयांची लाच, ७० वर्षीय तलाठ्याला सक्तमजुरीची शिक्षा!

बेळगाव : सर्वोच्च न्यायालयानं ५०० रुपयांची लाच घेतल्याबद्दल ७० वर्षीय निवृत्त तलाठ्याला एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. एका शेतकऱ्याकडून त्याच्या शेतजमिनीचा आरटीसी (राईट्स, टेनेन्सी आणि पीक रेकॉर्ड) देण्यासाठी ३० वर्षांपूर्वी ५०० रुपयांची लाच घेतल्याबद्दल तलाठी दोषी आढळला होता.

नागेश धोंडू शिवनगेकर असं या तलाठ्याचं नाव असून सध्या त्याची बेळगाव येथील हिंडलगा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. १९९५ मध्ये लोकायुक्त पोलिसांनी नागेशला लाच घेताना रंगेहाथ पकडले होते. त्यावेळी नागेश कडोलीमध्ये तलाठी म्हणून काम पाहत होता. तेव्हा कडोली गावातील शेतकरी लक्ष्मण रुकम्माण्णा कटंबळे यांच्याकडून त्यांच्या शेतजमिनीच्या वाटणीसंदर्भातील नोंद करण्यासाठी ५०० रुपयांची लाच घेतली होती.

दरम्यान, कटंबळे कुटुंबातील सदस्यांमध्ये शेतीच्या जमिनीचं वाटप झाल्यानंतर लक्ष्मण कटंबळे यांनी नागेशकडे आपल्या नावावर आरटीसी देण्यासाठी संपर्क साधला होता. तेव्हा नागेशनं त्यांच्याकडे लाच मागितली. याबाबत लक्ष्मण यांनी लोकायुक्त पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. नंतर नागेशला लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आलं आणि त्याला अटक करण्यात आली. याप्रकरणी विशेष न्यायालयानं नागेशला लाच घेतल्याबद्दल १४ जून २००६ रोजी दोषी ठरवलं आणि त्याला एक वर्ष सक्तमजुरी आणि १००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

या शिक्षेनंतर नागेशनं कर्नाटक उच्च न्यायालयाच्या धारवाड येथील सर्किट बेंचमध्ये आपल्या शिक्षेवर प्रश्न उपस्थित केले. त्यानंतर ९ मार्च २०१२ रोजी उच्च न्यायालयानं नागेशला आरोपातून मुक्त केलं. त्यानंतर लोकायुक्त पोलिसांनी उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयानं १८ जून रोजी विशेष न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळं तब्बल ३० वर्षानंतर याप्रकरणात पोलिसांनी नागेशला अटक करून हिंडलगा मध्यवर्ती कारागृहात पाठवले आहे.

## माळेगाव व मोहेगाव येथील आदिवासी बांधवांचे पुनर्वसन करा : ॲड.जयश्री शेळके

दैनिक आपला विदर्भ

**मोताळा/प्रतिनिधी :** मोताळा तालुक्यातील माळेगाव व मोहेगाव येथील अनेक शेतकरी व आदिवासी कुटुंबांनी सन १९९८ पासून या परिसरात आपले घर उभे करून वास्तव्य सुरू केले आहे. या कुटुंबांचे जीवन वनाशेजारील या भूभागाशी जोडले गेले असून, उपजीविका, शेती, गुरेपालन व मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी ही जमीनच एकमेव आधार ठरलेली आहे. परंतु वन विभागाच्या वतीने या सर्व शेतकरी व आदिवासी बांधवांच्या घरावर बुलडोजर चालवून त्यांना बेघर करण्यात आले आहे. या सर्वांचे नव्याने पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी केली आहे.

यातील बहुसंख्य नागरिक आदिवासी समाजातील असून ते





शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या संधींपासून आजही दूर आहेत. आपल्या कुटुंबासाठी ते गेली २५ वर्षे संघर्ष करीत आहेत. ही केवळ जमीन नाही, तर त्यांच्या आयुष्याची मुळं या मातीत रुजलेली आहेत. परंतु दुर्दैवाने, कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा आपली बाजू मांडण्याची संधी न देता वनविभागाने त्यांच्या घरांवर १५ मे २०२५ बुलडोझर चालवला आणि त्यांना अक्षरशः उघड्यावर आणून सोडले. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर या सर्व कुटुंबांचा निवारा हिरावून घेतल्याने लहानग्यांपासून वृद्धांपर्यंत सगळेच सद्या हवालदिल झाले आहेत. त्यामुळे त्रस्त होऊन संबंधित बांधव दि.१६ जून २०२५ पासून बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करीत आहेत.

''अनुसूचित जमाती व पारंपरिक वनवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६'' ( , २००६) नुसार – १३ डिसेंबर २००५ पूर्वीपासून वनजमिनीवर वास्तव्यास असलेल्या व उपजीविकेसाठी ती जमीन वापरणाऱ्या कुटुंबांना त्या जमिनीवर हक्क बहाल करण्यात येऊ शकतो. अशा हक्कांचे संरक्षण करण्यात आले असून, कोणतेही पुनर्वसन न देता कुटुंबांना विस्थापित करणे ही मानवी हक्कांची पायमल्ली आहे. या कायद्याअंतर्गत, ग्रामसभेला ही बाब विचारार्थ सादर करून त्यांच्या पुनर्वसनाचा निर्णय घेणे बंधनकारक आहे.

वनविभागाने संबंधित गावांमध्ये कारवाई करीत असतांना वरील वनहक्क कायद्यांना न जुमानता सरसकटपणे गावातील अनेक शेतकरी व आदिवासी बांधवांच्या घरांवर व शेतीवर बुलडोजर चालवून या आदिवासी बांधवांना त्यांच्या मुलभूत हक्कांपासून वंचित केले आहे. या सर्व शेतकरी, आदिवासी बांधवांचे मुलभूत हक्क व अधिकार कायम रहावेत तसेच मानवता व मानवाधिकाराच्या दृष्टीने वनक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या या शेतकरी, आदिवासी बांधवांचे पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी केली आहे.

## विविध वृत्त...

### जळगावमध्ये 'हिट अँड रन'चा थरार! भरधाव कारने महिलेला उडवलं

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील महाबळ परिसरात हिट अँड रनची घटना घडली आहे. इथं एका भरधाव कार चालकाने पादचारी महिलेला उडवलं आहे. या अपघातात महिला गंभीर जखमी झाली. त्यांना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.या अपघाताचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी कारचालकाला अटक केली आहे. त्याने मद्यधुंद अवस्थेत कार चालवत हा अपघात केल्याचं प्राथमिक तपासात समोर आलं आहे. पोलीस या घटनेचा सविस्तर तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, जळगावच्या महाबळ परिसरात गुरुवारी रात्री हा अपघात घडला. अपघाताच्या वेळी वंदना सुनील गुजराथी या रस्त्याने चालत जात होत्या. यावेळी पाठीमागून आलेल्या भरधाव कारने त्यांना धडक दिली. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. या अपघातानंतर मद्यधुंद अवस्थेतील कारचालक पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. मात्र स्थानिकांनी त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलं. तसेच जखमी वंदना यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आलं. मात्र उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांच्या मोटू शिवपाल सैनी नावाच्या आरोपीला अटक केली. त्याच्याविरोधात रामानंद पोलीस स्टेशनमध्ये सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या हिट अँड रनचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यातही कैद झाला असून मद्यधुंद अवस्थेत आरोपीनं भरधाव वेगाने कार चालवत इतर काही वाहनांनाही धडक दिल्याची माहिती आहे.

### डोंबिवलीकरांसाठी पुन्हा 'तारीख पे तारीख'! पलावा ब्रिजच्या उद्धाटनसाठी मुहूर्त मिळेना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** वाहतूककोंडी हा सगळ्याच मोठ्या शहरातील प्रश्न झाला आहे. यासाठी सरकार मोठमोठे पूल, मेट्रो अशा अनेक गोष्टी तयार करत आहे. पण जनतेच्या फायद्यासाठी तयार केल्या जाणाऱ्या या गोष्टींचं उद्धाटना अभावी वापरतात येत नाहीये. कल्याण-शिळ रोडवरील पलावा जंक्शन येथील रेल्वे उड्डाणपुलाच्या दोन नव्या लेन मार्चपासून प्रवाशांसाठी सुरू करण्याचं आश्वासन कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी दिलं होतं. मात्र, कामाची गती संथ असल्याने या पुलाचं उद्धाटन मे अखेरीस होणार असल्याचं पुन्हा सांगण्यात आलं. '' कल्याण- शीळ रोडवरील पलावा जंक्शन रेल्वे उड्डाणपुलाच्या दोन नव्या लेन येत्या मेपासून प्रवाशांसाठी खुल्या करण्यात येणार आहेत. सदरचा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येत असल्याने येथून लाखो वाहन धारकांना वाहतूक कोंडीपासून होणार त्रास कमी होणार आहे. मे अखेरीला हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल.'' अशी माहिती कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी त्यावेळी दिली होती.

फक्त तारीख सांगितली जाते उद्धाटन होत नाही यबद्दल आंदोलन करण्यात आले होते. या विलंबाविरोधात ठाकरे पक्षाचे कल्याण ग्रामीण जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे आणि मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी एकत्र येत काही दिवसांपूर्वी गाजर व नोटा दाखवून आंदोलन केलं होतं. तरीही परिस्थितीत काहीही बदल झाला नाही. आता जून महिना संपत आला तरी पुलाचं उद्धाटन झालेलं नाही. यामुळे पुन्हा एकदा ठाकरे पक्ष आक्रमक झाला असून दीपेश म्हात्रे यांनी सत्ताधाऱ्यांवर थेट आरोप करत, ''हे खोटारडे लोक आहेत, फक्त तारीख देऊन लोकांची दिशाभूल करत आहेत.'' असे ते म्हणाले

### 'गंगापूर'मधून विसर्ग वाढवला, नाशिकमधील पाच धरणांतून सोडलं पाणी, नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक शहरासह जिल्ह्यात गुरुवारी (दि. १९) झालेल्या पावसाने धरण साठ्यात कमालीची वाढ झाली आहे. यामुळे गंगापूर धरणातून शुक्रवारी (दि. २०) सकाळी ९ वाजेपासून धरणातून एक हजार क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला होता. तर नाशिकमधील इतर चार धरणांमधून देखील पाणी सोडण्यात आले आहे. आता शनिवारी गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. त्यामुळे नदीकाठच्या परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

शुक्रवारी (दि. २०) सायंकाळपासून पावसाने विश्रांती घेतल्यानंतर गोदावरी नदीच्या पाणीपातळीत घट झाली आहे. गुरुवारी गोदाकाठावरील दुतोंड्या मारुतीच्या मूर्तीच्या कमरेपर्यंत आलेले पूरपाणी शुक्रवारी पायापर्यंत खाली उतरले. पाणी ओसरू लागल्यामुळे गोदाकाठावरील जनजीवन हळूहळू पूर्वपदावर येत आहे. शुक्रवारी सकाळी ६ वाजता गंगापूर धरणातून ५०० क्यूसेक, तर सकाळी ९ वाजता १,००० क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात आला. या विसर्गासाठी गंगापूर धरणाच्या ९ दरवाजांपैकी ३ दरवाजे उघडण्यात आले आहेत.

# केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या बुलढाणा लोकसभा मतदारसंघात योग दिन उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

**गावापासून ते जिल्हास्तरीय योगदिन कार्यक्रमात बालक, युवक,युवती, महिला -पुरुष आणि वयोवृद्धांनीही नोंदविला सहभाग**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील गाव गावात , शहरी भागात आणि जिल्हास्तरावर आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं होतं या कार्यक्रमांमध्ये लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनीच सहभाग नोंदवित योग साधना करून आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा केला

'' एक पृथ्वी आरोग्यासाठी योग '' हे या वर्षीच घोषवाक्य एक पृथ्वी, एक आरोग्य यासाठी योग या संकल्पनेवर आधारित यंदाचा योग दिन कल्याणकारी एकात्मिक दृष्टिकोन देणारा ठरणार आहे. ''सर्वे सन्तु निरामयः '' (सर्व रोगमुक्त होऊ देत) या भारतीय नीति तत्त्वातून मानव आणि ग्रहांच्या आरोग्याच्या परस्परसंबंधावर यामध्ये भर दिला आहे.

यावर्षीचा अकरावा आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्य केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या बुलढाणा लोकसभा मतदारसंघात गाव पातळीपासून शहर आणि जिल्हास्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले होते तालुकास्तरावर तालुका क्रीडा मैदान , शाळा , ग्रामपंचायत अशा विविध स्तरांवर अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते बुलढाणा येथील जिजामाता स्टेडियम येथे जिल्हास्तरीय योग दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी दीप प्रज्वलन करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे अतिरिक्त पोलीस अधीक्षक बी बी महामुनी यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच संगीतमय योगा क्षितिज निकम यांनी सादर केला त्यानंतर योग्य शिक्षिका अंजली परांजपे योगशिक्षक प्रशांत लहासे आर्ट ऑफ लिव्हिंगचे योग प्रशिक्षक सचिन ठाकरे प्रजापिता विश्व ब्रह्मकुमारी संस्थांच्या दिदी यांनी योगासने प्राणायामय ध्यान या योग प्रात्यक्षिकांचे महत्व विषद करत योगासने करून घेतली प्रत्येकांनी आपल्या जीवनामध्ये दररोज योग साधना करावी अस आवाहन यावेळी करण्यात आले. जिल्ह्यात तालुकास्तरावर क्रीडा मैदान आणि ग्रामीण भागामध्ये ही गाव पातळीवर ग्रामपंचायत व जिल्हा परिषद शाळांमध्ये योगदिन साजरा करण्यात आला . गावपातळीपासून तर जिल्हा पातळीपर्यंत या योग दिन कार्यक्रमांमध्ये लहानांपासून तर वयोवृद्धांपर्यंत विद्यार्थी युवक युवती महिला पुरुष आणि वयोवृद्धांनी योग साधनेत सहभाग नोंदवून आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा केला.






## कर्जतमध्ये भीषण अपघात, कार ओव्हरटेक करताना वृद्ध दांपत्याला उडवले, मध्यप्रदेशच्या तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले

**रायगड /प्रतिनिधी :** रायगडच्या कर्जत तालुक्यातील नेरळ-कळंब मार्गावर रविवारी भीषण अपघात झाला. वरई गावाजवळील एक्सपेरिया साईट रोडवर कार आणि स्कुटीची समोरासमोर धडक होऊन वृद्ध दांपत्याचा जागीच मृत्यू झाला. ओव्हरटेक करत असताना समोरून येणाऱ्या सेलेरिओ कारने स्कुटीला जोरदार धडक दिली. या धडकेत वृद्ध दांपत्य रस्त्यावर दूर फेकले गेले आणि घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला. राज्यात गेल्या काही महिन्यांपासून रस्ते अपघातांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. वेग, निष्काळजीपणा आणि वाहतुकीचे नियम पाळण्यात येणारी हलगर्जीपणा या कारणांमुळे अनेक ठिकाणी जीवितहानी होत आहे. कर्जत तालुक्यातील वरई येथील एक्सपेरिया साईट रोडवर भीषण अपघात झाला या अपघातात एका वृद्ध दांपत्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.




दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी :** लोणार तालुक्यातील ब्राह्मण चिकना गावाजवळ नागपूर मुंबई नॅशनल हायवे वर चार-पाच महिन्यापासून भला मोठा खड्डा पडला होता त्यामुळे अनेक वाहनाचा अपघात होऊ लागला परिसरातील नागरिकांनी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांना या खड्ड्या विषयी माहिती दिली असता सानप यांनी नॅशनल हायवेचे अभियंता महेश पुनसे यांना याबाबत माहिती दिली असता महेश पुनसे यांनी सुरवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली असता सानप यांनी आक्रमक पवित्रा घेत आंदोलनाचा इशारा दिला इशारा दिल्यानंतर त्या खड्या मध्ये गिट्टी टाकुन खड्डा बुजवला पण डांबर मिश्रण केले नाही नुसती गिट्टी टाकली त्यामुळे नॅशनल हायवे वरून जाणाऱ्या मोटरसायकल या गिट्टी वरून घसरुण, स्लीप होऊन या ठिकाणी मोटरसायकल वाले घसरून पडत आहे व एसटी बस किंवा ट्रक सह इतर वाहने त्या खड्ड्यात आदळल्यामुळे बॅलन्स हुकत आहे त्यामुळे मोठ्या वाहनाचाही अपघात होण्याची शक्यता आहे आज रोजी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांनी पत्रकार परिषद घेऊन मागणी केली की महेश पुनसे अभियंता यांना वारंवार माहिती देऊन सुद्धा त्यांनी याची दखल घेतली नाही नुसते ठेकेदारावर कारवाई चे पत्र काढले आज पासून खड्ड्यांमध्ये अपघात होऊन जिवीतहानी झाली तर महेश पुनसे यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा आणि त्यांना तात्काळ सेवेतून निलंबित करावे अशी मागणी सानप यांनी पत्रकार परिषदेत केली आहे

या नॅशनल हायवेवर सुलतानपूर पासून ते सिंदखेडराजा पर्यंत अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहे ते पण तात्काळ डांबराने बुजवणयाची मागणी सानप यांनी केली

## नागरे महाविद्यालयाने योग दिनाच्या निमित्ताने २१ पिंपळाच्या वृक्षांची केली लागवड





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** स्थानिक दुसरबीड दि २१ नारायणराव नागरे महाविद्यालयामध्ये माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून २७ सप्टेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्र संघाच्या परिषदे मध्ये त्यांनी २१ जून हा जागतिक योग दिन साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला होता तेव्हा पासून २१ जून हा दिवस जागतिक योग दिन म्हणून साजरा करण्याची सुरुवात करण्यात आली आहे तेव्हापासून आमच्या महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या वतीने यावर्षी अकरावा जागतिक योग दिन साजरा करण्यात आला यानिमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर विजय नागरे आधीसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य तसेच कार्यक्रमाधिकारी यांनी या योग दिनाच्या निमित्ताने एक पृथ्वी एक स्वास्थ्यासाठी योग या थीम नुसार २१ पिंपळाची वृक्ष लावण्याची संकल्पना मांडली आणि पिंपळ वृक्षांची लागवड केली तसेच महाविद्यालयातील प्रत्येक प्राध्यापकास तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यास पिंपळाचे एक वृक्ष आपण लावावं अशी इच्छा व्यक्त केली या कार्यक्रमासाठी प्राध्यापक डॉक्टर डी एस देशमाने, प्राध्यापक डॉक्टर जी एस घुगे, प्राध्यापक शेख युनूस, प्राध्यापक जगदीश यादव ,प्राध्यापक देवानंद नागरे, प्राध्यापक महेर सर,प्राध्यापक सत्यम सर, प्राध्यापक नयना मॅडम, प्राध्यापक बी डी शिंदे ,प्राध्यापक मिलिंद गवई, तसेच बी एस पंढरे,बी जी कायंदे ,अनिल रणमळे आदी शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

## धनुष अभिनीत कुबेर चित्रपटाचं सोशल मीडियावर कौतुक, प्रेक्षकांनी केला प्रेमाचा वर्षाव...

**मुंबई/प्रतिनिधी :** तामिळ अभिनेता धनुषचा दोन वर्षानंतर कुबेर चित्रपटातून तेलुगू चित्रपटसृष्टीत पुनरागमन करत आहे. आज २० जून रोजी त्याचा कुबेर चित्रपट रुपेरी पडद्यावर रिलीज करण्यात आला आहे. चित्रपटाच्या थिएटर प्रीमियरनंतर काही तासांनी, प्रेक्षकांनी या चित्रपटाबद्दल एक्सवर आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. काही लोकांनी चित्रपट खूप मोठा आहे, असं सांगत यावर टीका केली आहे. प्रेक्षकांनी धनुषच्या उत्कृष्ट अभिनयाचे देखील आता कौतुक केलं आहे. एका यूजरनं म्हटलं आहे, ही भूमिका सोपी नव्हती, परंतु धनुषनं त्यात जीवंतपणा आणला. दुसऱ्या एकानं या चित्रपटाबाबत लिहिलं, धनुषचा दमदार अभिनय, रश्मिका मंदान्नाबरोबर उत्तम केमिस्ट्री. आणखी एकानं लिहिलं, धनुषचा उत्कृष्ट अभिनय होता मात्र चित्रपट लहान करता आला असता तर ते ठिक झालं असतं.

धनुषचं केलं चाहत्यांनी कौतुक : याशिवाय काहीजणांनी म्हटलं, धनुषच्या करिअरमधील सर्वोत्तम चित्रपट हा आहे. आता धनुषनं कुबेरमधील त्याच्या भूमिकेमुळं सर्वांची मनं जिंकली आहेत. या चित्रपटाचं दिग्दर्शन शेखर कम्मुला यांनी केलं आहे. कुबेर चित्रपटामध्ये आर्थिक गुन्ह्यांच्या काळ्या बाजू दाखविण्यात आल्या आहेत. चित्रपटात काळा पैसा, संस्थात्मक भ्रष्टाचार आणि सामाजिक शक्ती संरचनाबद्दल काही ठळक गोष्टी प्रेक्षकांना पाहायला मिळेल. हा चित्रपट तमिळ, तेलुगू आणि हिंदीमध्ये प्रदर्शित झाली आहे. दरम्यान २०२३ च्या ब्लॉकबस्टर वाथी नंतर धनुषचा तेलुगू चित्रपटसृष्टीतील दुसरा चित्रपट आहे.

# लोणार येथे जागतिक योग दिन उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

**माजी आमदार संजय रायमुलकर यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांचा सहभाग**

**लोणार/प्रतिनिधी :** शरीराच्या, मनाच्या आणि आत्म्याच्या समतोलासाठी योगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात येतो. लोणार येथेही आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली जागतिक योग दिनानिमित्त योगशिबिर घेण्यात आले. या शिबिरामध्ये माजी आमदार संजय रायमुलकर यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना माजी आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २७ सप्टेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेत जागतिक योग दिन साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला आणि आज संपूर्ण जग या भारताच्या महान संस्कृतीचा गौरव करत आहे. योगविद्या आणि ध्यानधारणा ही आपल्या भारतीय परंपरेची जगाला मिळालेली अनमोल देणगी आहे. या अद्भुत शास्त्राचा प्रचार, प्रसार आणि संवर्धन करणे ही काळाची गरज आहे आणि म्हणूनच आज संपूर्ण विश्व ''जागतिक योग दिन'' साजरा करत आहे. योग ही भारताची प्राचीन आणि अमूल्य देणगी आहे.

आपल्या शरीराच्या, मनाच्या आणि आत्म्याच्या समतोलासाठी योगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. योगः कर्मसु कौशलम् या भगवद्गीतेतील शिकवणीनुसार योग ही केवळ व्यायामाची पद्धत नसून, ती आरोग्य, समतोल आणि मानसिक शांती प्राप्त करण्याची जीवनशैली आहे. एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग या २०२५ सालच्या संकल्पनेनुसार आयुष मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणाऱ्या या प्राचीन परंपरेचा प्रचार करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून योगाचे विविध आसन, प्राणायाम व ध्यान यांचे महत्त्व सांगण्यात आले. एक पृथ्वी, एक आरोग्य या संकल्पनेची मूर्त अमलबजावणी घडून आली. असे माजी.आ.संजय रायमुलकर म्हणाले.शिबिरात तहसील, मेहकरचे उपविभागीय अधिकारी, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि असंख्य योगप्रेमींनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.



